दा. क्र. ११०
विषय किशोर क्र. ८९

# बासरीमध्ये लपले राक्षस

लेखक

मधुकर रानडे

प्रकाशन क्रमांक ६६

किंमत दोन रुपये पन्नास पैसे

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय ........................
दा.क्र. ११०

BV BK-0400113

वी वी
वी क्र 990

म. पं. सं. ... शाखा
... 
... 990 ...
विषय किशोर ...

BVBK-0400110

प्रकाशिका

सौ. निर्मला नारायण अरगडे
सौ मालिनी माधव कुलकर्णी
अरगडे कुलकर्णी प्रकाशन,
१६/२२४ लोकमान्यनगर
पुणे ३०.

सर्व हक्क प्रकाशिकाधीन

○

प्रथमावृत्ती · १९६९
पुनर्मुद्रण जून १९७५

○

चित्रकार श्रीनिवास वैद्य

○

मुद्रक
प्रभाकर सरदेसाई *M Sc.*
अक्षर मुद्रणालय,
४७, इंडस्ट्रियल इस्टेट
नागरगाव, लोणावळा

---

## प्राप्तिस्थान :

अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक
पुणे ३०

सौ. मालिनी कुलकर्णी
बद्रिकाश्रम, १ ली खेतवाडी,
अलंकार टॉकीजजवळ मुंबई ४

# बासरीमध्ये लपले राक्षस

पहाटेची वेळ होती मंद वारा वहात होता. आकाशातील चांदण्या आपला खेळ संपवून आता दमल्या होत्या. रात्रभर त्यांची झिम्मा फुगडी, लपंडाव चालला होता सारं काही शांत होत चंद्र पश्चिमेकडे कलला होता जणू काही सूर्याच्या आगमनाची चाहूल लागून तो घाबरून पळत सुटला होता काही भुरे ढग उगाचच इकडून तिकडे फिरत होते रिकामटेकड्या मुलासारखे.

जात्यावर खेड्यातील बायका दळत असताना गाणं म्हणत होत्या

| | |
|---|---|
| संपली रात बाई | दीस हा उजाडला |
| कृष्णाच्या खोड्यांनी ग | राधेचा घट फोडला-- १ |
| हाती घेऊनिया खडा | गोकुळी उभा कृष्ण |
| पाहता गौळणीला | वाजवी बासरीला-- २ |
| नाही गौळणींना राग | जरी पळविली लुगडी |
| कृष्णाचेच वेड त्यांना | खेळल्या त्या फुगडी – ३ |
| धन्य तुझी कृष्णदेवा | तूच कंसासी मारिले |
| गोवर्धन उचलोनी | गोकुळासी तारियले–४ |

काही ठिकाणी लोक नदीवर स्नानासाठी चालले होते पशु–पक्षी मात्र अजून गुलाबी थंडीत आराम घेत होते. पाखरांच्या घरट्यात आईच्या पंखाखाली झोपलेली पिले सुंदर स्वप्ने पहात होती–

याच वेळी राजवाड्यात महाराज शूरसेन पलंगावरून उठून ओरडत सुटले! जणू काही त्यांच्या मागे भूतच लागले होते. ते ओरडत चालले होते. 'याचा अर्थ काय? याचा अर्थ काय?' त्यांच्या

या ओरडण्याने सारा राजवाडा जागा व्हायची वेळ आली. दिवे लागले गेले महाराज जे स्वत'च्या महालातून धावत सुटले ते महाराणीसाहेबाचे दारापुढे येऊन उभे राहिले महाराणीसाहेब, गोडगुलाबी स्वप्नात होत्या. तसेच राजकुमारी रत्नाही महाराज शूरसेनांनी महाराणीसाहेब यांचे महालाचे दारावर हात मारून हाक मारण्यास सुरुवात केली. 'राणीसाहेब, राणीसाहेब! याचा अर्थ काय?' हे त्याचे ओरडणे ऐकून महाराणीसाहेब ताडकन् पलंगावर उठून बसल्या. त्यांनी महालातला दिवा लावला त्यांनी रत्नाला जागे केले. तीही ऊठली त्यानी दार उघडले महाराज शूरसेन अगदी घामाघूम झाले होते त्यांना तसे पहाताच शीलवती म्हणाली, " महाराज, काय झालं? "

'काय सागू महाराणीसाहेब! मला एक विचित्र स्वप्न पडल आहे!'

"काय स्वप्न पडल? मग महाराजाना अस घाबरा-यला काय झालं ?"

'अहो मी त्या स्वप्नात एक मोठ्ठा राक्षस पाहिला'

'अगबाई !'

'तो राक्षस ऽऽ बाप रे ! नुसत्या कल्पनेन मला कापर भरायची वेळ आली आहे.'

'मोठ नवलच म्हणायचं.' राणीसाहेब म्हणाल्या– 'या, असं कोचावर बसाव महाराजांनी ?'

शूरसेन कोचावर बसला. शीलवती व रत्ना दुसऱ्या कोचावर बसल्या

'स्वप्न अस पडलं तरी काय ?' शीलवतीने विचारले.

'एक मोठा सागर आहे. त्यांत एक राक्षस उभा आहे. तो मला म्हणतो आहे. तुझ्या मुलीचे स्वयंवर मांड.

ती आता उपवर झाली आहे.'

'बरं, मग पुढे?

'त्याने मात्र पुढ असं सांगितलं की, हे राजा जो कोणी सागराच्या तळाशी असलेल्या रत्नांच्या खजीन्यातून एक एकाच वेळी तीन रंगात चमकणारं रत्न आणून तुला देईल त्यालाच तुझ्या मुलीन माळ घातली पाहिजे.',

"अगबाई, मोठ्ठ विचित्रच स्वप्न म्हणायचं."

"काय सागरांतून रत्न काढून आणायच? बरंच कठीण काम आहे. आणि हे धाडस तरी करणार कोण?" रत्ना म्हणाली.

"हो ना बाळे, तुझं स्वयंवर मांडाव अशी माझ्या स्वप्नांत देखील कल्पना आली नव्हती"

"नाहीतर काय ? एकुलती एक राजकन्या. तिच्या लग्नाची येवढी घाई का ?"

"हो! पण करायच तरी काय ? जे जे नशीबात आहे ते घडणारच, यात तीळमात्र शंका नाही"

"पण महाराज, तुमच्या स्वप्नांत राक्षसच कसा आला? वास्तविक पाहता एखादा देव यायला पाहिजे होता."

त्याच्या येण्यात सुद्धा काही तरी अर्थ असला पाहिजे".

शूरसेन पुन्हा विचारमग्न झाला. शीलवतीही विचार करू लागली. रत्नालाही काही सुचेना. वास्तविक पहाता अशा गोड थंडीच्या वेळी पांघरूणांत उब घेत पडायचं आणि सूर्याची कोवळी किरण खिडकीतून तिचे खोलीत आल्यावर उठायच असा तिचा नित्याचा कार्यक्रम होता

शूरसेन उठला त्याने एका दासीला बोलावले. त्याने तिला बाहेर जाऊन एका सेवकाला हाक मारावयास सांगितले. थोड्याच

वेळात सेवक आला व शूरसेनाला लवून मुजरा करीत म्हणाला, "महाराज काय आज्ञा आहे?"

"हे पहा ताबडतोब जाऊन प्रधानाला बोलावून घेऊन ये अगदी असाल तसे या, असा निरोप दे" शूरसेन म्हणाला सेवक निघून गेला

शीलवती म्हणाली, "पण महाराज अशी स्वप्न पडली तर आपण आपल्या राजज्योतिषाला विचाराव अस मला वाटत"

हे ऐकून शूरसेन म्हणाला, "बरी वेळेवर आठवण करून दिलीत मी आता निरोप देतोच. असे म्हणून त्याने दुसऱ्या सेवकाकडून राजज्योतिषी रसिकास बोलावले आता उषःकाल झाला होता उषादेवी आपल्या हातात गुलाल घेऊन सृष्टीवर उधळीत पूर्वेच्या बाजूने येत होती तिला पाहून सर्वांना आनंद वाटत होता थोड्याच वेळात प्रधान सूचकही हजर झाला. त्याने शूरसेनाला लवून मुजरा केला व म्हणाला, "महाराज अशा प्रातः-समयी मला बोलावण केलत, असं घडल तरी काय?"

"काय सांगू सूचका! आयुष्यात कधी घडल नाही ते घडा-यची आज वेळ आली आहे" शूरसेन म्हणाला.

"पण अस झाल तरी काय?"

"मला एक विचित्र स्वप्न पडल आहे त्यात एका राक्षसान मला राजकुमारीच स्वयंवर करण्यास सांगितल आहे."

"आश्चर्यच म्हणायच"

"आश्चर्य तर यापुढेच आहे. त्याने मला स्वयंवराची मोठी विचित्र अट घातली आहे."

"काय स्वयंवराची अटही घातली आहे?"

"हो! जो कोणी तीन रंग एकाच वेळी दाखविते असे रत्न सागराचे तळातून काढून आणील त्यालाच राजकुमारीने माळ

घालावी असं सांगितलं आहे."

"पण महाराज, स्वप्नच ते? मग चिंता का करता? काही वेळा अशी पडतात स्वप्नं

"मग काय करावं असं आपलं म्हणणं आहे?"

"महाराजांनी स्वस्थ रहावं."

"ते शक्य नाही. उगाच नसती शंका मनात आली असता गप्प बसू! माझ्या कन्येच्या जीवनाचा प्रश्न आहे."

"तेही खरंच, पण आता यावर उपाय काय?"

"तुम्हीच सांगा काय करावं ते?"

"मला वाटतं अजून दोन तीन दिवस गप्प बसावं"

यावेळी रसिक तेथे आला. त्याने महाराज शूरसेनाला लवून मुजरा केला.

"या महाराज, आज तुमच्या भविष्याची सत्त्वपरीक्षा आहे."

"म्हणजे मी नाही समजलो!"

"आता आमची कन्या रत्ना हिचं स्वयंवर मांडायचं आहे. त्याचा मुहूर्त पहा."

"काय ? राजकुमारीचं स्वयंवर ! काय म्हणताय काय महाराज ?"

"हो खरे आहे" असे म्हणून शूरसेनानं त्याला पडलेले स्वप्न रसिकाला सांगितले रसिक 'आ' करून राजाकडे पाहू लागला.

"अहो असे 'आ' करून माझ्याकडे काय बघता ? बोला काय करायचं ते."

"मला वाटतं महाराज दोन दिवस आपण थांबावं आणि हेच स्वप्न पुनः पडलं तर मग विचार करावा."

"मला एक एक क्षण युगासारखा वाटू लागला आहे. तेव्हा काहीतरी निकाल लावलाच पाहिजे"

"महाराज आई जगदंबेची आपल्यावर कृपा आहे माझं ऐका, तीच मार्ग दाखवील काहीतरी."

शीलवती व रत्ना यानीही हेच मत व्यक्त केले.


प्रधान सूचकालाही हेच बर वाटल

या सर्वांचे विचारांती दोन दिवस वाट पहायची अस ठरलं शूरसेनाला सूचक व रसिक दोघेही मुजरा करून निघून गेले. शूरसेनही आपल्या महालात निघून गेला

हा हा म्हणता ही बातमी सर्वत्र पसरली राजाला विचित्र स्वप्न पडल हे ऐकून प्रजाजनाना जरा आश्चर्य वाटल आणि तस वाटण साहजिकच होते शूरसेन चांगला राजा होता तो आपल्या प्रजेसाठी, प्रजेच्या कल्याणासाठी अहोरात्र झटत असे. त्याचे इतर राजाबरोबरचे सबंधही मित्रत्वाचे होते तो शूर तर होताच पण दिलदारही त्याने अनेक देवळे बाधली होती. अनेक गरिबांना व सस्थाना देणग्या देऊन त्याचेवरील सकटे दूर केली होती प्रजेचे त्याच्यावर फार प्रेम होते. 'प्रजा हीच पूजा' असे त्याला वाटत असे

शूरसेन आपल्या महालात गेला खरा पण फार अस्वस्थ स्थितीत त्याला त्याची कन्या रत्ना ही स्वतःच्या प्राणा-पेक्षाही जास्त होती तिला थोड काही होऊ लागल की शूरसेनाचा जीव खाली वर होत असे त्याने प्रातर्विधी उरकले स्नान केले. तो देवदर्शनाला गेला राजधानीचे मध्यावर रामाचे देऊळ होते. त्याने देवळातील घटा वाजविली व रामाला नि सीतेला नमस्कार केला. तो अश्रूपूर्ण नयनांनी रामाला म्हणाला, 'हे प्रभो रामचंद्रा आपणही स्वयवरात सीतेला जिंकलेत. त्याप्रमाणे माझ्या रत्नालाही

एक राम पाहून द्या तुमचे मंदिरावर मी सोन्याचा कळस चढवीन. त्याने देवाला फुले वाहिली. पुन्हा नमस्कार करून तसाच त्या रामसीतेच्या मूर्तीपुढे उभा राहिला. याच वेळी शीलवती व



रत्नाही तेथे त्याचे मागे येऊन उभ्या राहिल्या त्या हात जोडून उभ्या होत्या पुन्हा राजा शूरसेन म्हणाला, "हे प्रभो, रामचंद्रा माझ्या आयुष्यात अद्यापि वनवास कधीच आलेला नाही. तुझ्या कृपेने सर्व काही ठीक चालले आहे. हे सृष्टिकर्त्या परमेश्वरा, या जगातील सर्व काही तुझ्या आज्ञेवरून चालते. तारणे अथवा मारणे तुझ्याच हातात आहे."

शीलवती म्हणाली, "देवराया मी जर याची सीतामाई. प्रमाणे पत्नी असेन तर तू मला या संकटातून वाचव. हे सीतामाई

तुझे स्वयंवराप्रमाणे माझ्या कन्येचही स्वयंवर आहे तरी आशी-र्वाद दे ”

असे म्हणून तिने देवाला हळदी-कुंकू व फुले वाहिली. रत्नानेही तसेच केले. शूरसेन मात्र परमेश्वरापुढे हात जोडून उभा होता तो तसाच देवळात कुणीही नव्हते. का कुणास ठाऊक ? त्या मूर्तीचे, सीतेच्या मूर्तीचे तोंडातून मधूर स्वर येऊ लागले–

‘होते जनकाची मी जानकी — कन्या भाग्यवती,
परतु होती माता माझी — वसुधा भूवरती–
तिच्या कृपेने माझे झाले — सारे कल्याण
देशी सत्वरी गरीब ब्राह्मणा — तू ते भूदान––
होता ब्राह्मण सतुष्टच तो — देशिल आशीर्वाद–
सकट तुझे जाईल पळुनी — नुरेल काही बाद–
पुष्प माझ्या पायावर — उचलुनी हे सत्वरी
ठेव जपूनी तू सुवर्णपात्री — सकट जें सांवरी–’

या मधुर आवाजाने शूरसेन जागा झाला शीलवतीने अत्यानंदाने ते फूल उचलले. रत्नाला तर ‘काय करू नि काय नको’ असे झाले. पुन्हा राम-सीतेला नमस्कार करून ते राजदांपत्य राजवाड्याकडे परतले. शूरसेनाची भीती आता जरा कमी झाली शीलवती व रत्ना यानाही धीर आला. ती सर्व दुसऱ्या दिवसाची वाट पाहू लागली.

शूरसेनाची रात्र जाता जाईना ! त्याला वाटले परमेश्वराने रात्र तरी कशाला निर्माण केली ? तो अस्वस्थ झाला होता. आता पहाट झाली होती शूरसेनाला आता कोठे थोडीशी झोप लागणार तोच तेच स्वप्न पुन्हा त्याचे पुढे दत्त म्हणून उभे राहिले. तो घामाघूम झाला त्या राक्षसाचे ते भयकर रूप पाहून त्याला काय करावे हे सुचेना त्याने दिवा लावला. तो पलंगावर बसून

त्या स्वप्नाची आठवण करू लागला

सकाळ झाली शूरसेनाने घडलेली हकीकत सूचक व रसिक याना सांगितली शीलवती व रत्नाही ते स्वप्न पडल्याचे ऐकून जरा नाराजच झाल्या. पण करणार काय ? ऐकण्या पलीकडे काय होते त्याच्या हातात ! असाच तोही दिवस निघून गेला. तिसरे दिवशीही शूरसेनाला तेच स्वप्न पडले आता मात्र त्याची खात्री झाली की, आपल्या कन्येचे स्वयंवर मांडले पाहिजेच. त्याने रसिक, सूचक वगैरेंना बोलावले तसेच शीलवती व रत्ना यांनाही बोलाविले. सर्व मंडळी शूरसेनाचे महालात जमली शूरसेन त्याना उद्देशून म्हणाला, 'आता आपण काहीतरी केलेच पाहिजे '

सूचक म्हणाला "होय महाराज आता स्वयंवर करणे प्राप्तच आहे " रसिकानेही या गोष्टीस दुजोरा दिला. शीलवती व रत्ना यानीही त्या गोष्टीस अनुमोदन दिले. झाले स्वयंवर करायच ठरल

शूरसेनाने स्वयंवरासाठी देशोदेशीचे राजाना पत्रे पाठविली. राजधानीतही या गोष्टीची बातमी दिली. सर्वजण याबद्दल विचार करू लागले शूरसेनाने लिहिले होते, "सागराच्या तळातून जो कोणी एकाच वेळी तीन प्रकारचा प्रकाश देणारे रत्न आणील त्याला माझी कन्या माळ घालील" अशा प्रकारची पत्रे जाताच प्रत्येकजण त्या रत्नाचे शोधासाठी प्रयत्न करू लागला कित्येक राजानी चांगले पाणबुडे पाठवून प्रयत्न केला पण छे ! कुणाला ते जमेना काही जादुगारानी खोटी रत्ने आणून राजाला फसविविण्याचा प्रयत्न केला पण त्याना शिक्षा झाली. जसजसे दिवस जाऊ लागले तसतसा शूरसेन चिंताग्र होऊ लागला रत्नाही काळजी करू लागली शीलवती तर अक्षरशः देवाचा धावा करीत होती.

त्याच राजधानीत रत्नाकर नावाचा एक कोळ्याचा मुलगा

राहात होता। वयाने वीस वर्षांचा दिसायला सुंदर अगदी राज-पुत्रासारखा तो गरीब असला तरी धाडशी होता त्याने त्या रत्नाचा शोध करायचे ठरवले त्याचे आई-वडिलांनी त्याला तसे करू नये म्हणून सांगितले. पण छे! त्याने एकदा निश्चय केला तो केला. शेवटी त्याने मोठ्या युक्तीने आईवडिललाची पर-वानगी काढली आणि एक दिवस सायकाळी तो आपल्या आईवडि-लांचा आशीर्वाद घेऊन बाहेर पडला. त्याने आपली होडी समुद्राचे पाण्यात लोटली

होडी लोटण्यापूर्वी त्याने सागराला नमस्कार केला त्याची होडी सागराच्या पाण्यावर पळू लागली. सागराच्या हसणाऱ्या लाटा त्याला म्हणत होत्या, "वेड्या का तू हे धाडस करीत आहेस ?" पण ही गोष्ट रत्नाकराचे ध्यानीमनीही नव्हती तो होडी वल्हवीत चालला होता. तो जात असता एक पक्षी त्याचे होडीवर बसला व गाऊ लागला—

पडू लागला आहे आता पृथ्वीवर अंधार
खाली पाणी वरती नभ तें अंधारतरी संचार
जोडीस आहे वेडा वारा पिसाट गातो गीत
प्रकाश देती वरूनि तारे जोडी लाटाचे संगीत—
किती आले कितीक गेले सागरी करूनी प्रवास
आज परी मज संधी मिळाली तुझा मिळाला सहवास—'

हे त्याचे गाणे ऐकून रत्नाकराने विचारले, 'तू कोण आहेस आणि माणसारखा कसा गातोस ?'

तो पक्षी म्हणाला, 'मी गंधर्व नगरीचा गंधर्व आहे. माझे हातून एक दिवस काही अपराध झाला. ह्यामुळे परमेश्वराने मला हे पक्षाचे रूप दिले आहे !'

'असं का ? अरे बापरे !'

'पण हे पहा, मी पक्षी असलो तरी तुला माझा उपयोग होईल. तू जाणार आहेस तिथे मला !'

'अरे, पण मी समुद्राचे मध्यावर जाऊन त्याचे तळाखाली असलेल्या रत्नांच्या भांडारातून रत्ने आणणार आहे'

'मग तर फारच उत्तम माझे हातून एक पाचूचा खडा चुकून समुद्रात पडला आणि याच चुकीने ही शिक्षा मला झाली आहे.'

'मोठ आश्चर्यच म्हणायच ! ठीक आहे, बरे झाले तू जोडीदार मिळालास.'

त्या दोघाचा प्रवास सुरू झाला रत्नाकर होडी वल्हवीत होता. आता सर्वत्र अंधार पसरला होता. वर आकाश आणि खाली पाणी ; याशिवाय काहीच दिसत नव्हते रत्नाकरने मात्र ठरविले की, काही झालं तरी माघार घ्यायची नाही याच वेळी एक तारा आकाशातून सुटून पाण्यात पडला. त्याबरोबर सागराचे पाणी एकदम पर्वताएवढे झाले आणि पुन्हा होते तसे. रत्नाकरची होडी दूरवर पाण्यात फेकली गेली. पण रत्नाकर होडीला घट्ट धरून. त्याला आता मात्र भीती वाटू लागली, हे पहाताच तो पक्षी म्हणाला,

'संकटाशी कर सामना यातच आहे सारे
इच्छित सारे मिळणार तुला ते हे नुसते वादळ वार
खुशाल वल्हव होडी आता जोडीदार उभा तुझा नियंता'

आता त्याची होडी भोवऱ्यासारखी गरगर फिरू लागली. त्याला याचा अर्थ कळेना. त्याला आता चक्कर येणार असे वाटू लागले. हे पहाताच तो पक्षी म्हणाला,

'असा फिरतो देह जगात परिस्थितीच्या वादळीं
झुज देऊन जगणाऱ्याला देव देतसे ताकद सगळी–१
फिरून फिरून ही होडी थांबेल नकोच तू घाबरू

राहात होता वयाने वीस वर्षांचा दिसायला सुंदर अगदी राज-पुत्रासारखा. तो गरीब असला तरी धाडशी होता त्याने त्या रत्नाचा शोध करायचे ठरवले. त्याचे आई-वडिलांनी त्याला तसे करू नये म्हणून सांगितले पण छे ! त्याने एकदा निश्चय केला तो केला. शेवटी त्याने मोठ्या युक्तीने आईवडिलांची पर-वानगी काढली आणि एक दिवस सायंकाळी तो आपल्या आईवडि-लांचा आशीर्वाद घेऊन बाहेर पडला त्याने आपली होडी समुद्राचे पाण्यात लोटली

होडी लोटण्यापूर्वी त्याने सागराला नमस्कार केला. त्याची होडी सागराच्या पाण्यावर पळू लागली सागराच्या हसणाऱ्या लाटा त्याला म्हणत होत्या, "वेडचा का तू हे धाडस करीत आहेस ?" पण ही गोष्ट रत्नाकराचे ध्यानीमनीही नव्हती. तो होडी वल्हवीत चालला होता. तो जात असता एक पक्षी त्याचे होडीवर बसला व गाऊ लागला—

पडू लागला आहे आता पृथ्वीवर अंधार
खाली पाणी वरती नभ ते अंधातरी संचार
जोडीस आहे वेडा वारा पिसाट गातो गीत
प्रकाश देती वरूनि तारे जोडी लाटांचे संगीत—
किती आले कितीक गेले सागरी करूनी प्रवास
आज परी मज संधी मिळाली तुझा मिळाला सहवास—'

हे त्याचे गाणे ऐकून रत्नाकराने विचारले, 'तू कोण आहेस आणि माणसारखा कसा गातोस ?'

तो पक्षी म्हणाला, 'मी गंधर्व नगरीचा गंधर्व आहे. माझे हातून एक दिवस काही अपराध झाला. ह्यामुळे परमेश्वराने मला हे पक्षाचे रूप दिले आहे !'

'असं का ? अरे बापरे !'

'पण हे पहा, मी पक्षी असलो तरी तुला माझा उपयोग होईल तू जाणार आहेस तिथे मला !'

'अरे, पण मी समुद्राचे मध्यावर जाऊन त्याचे तळाखाली असलेल्या रत्नांच्या भांडारातून रत्ने आणणार आहे'

'मग तर फारच उत्तम माझे हातून एक पाचूचा खडा चुकून समुद्रात पडला आणि याच चुकीने ही शिक्षा मला झाली आहे.'

'मोठ आश्चर्यच म्हणायच ! ठीक आहे, बरे झाले तू जोडीदार मिळालास.'

त्या दोघाचा प्रवास सुरू झाला रत्नाकर होडी वल्हवीत होता आता सर्वत्र अधार पसरला होता. वर आकाश आणि खाली पाणी ; याशिवाय काहीच दिसत नव्हते. रत्नाकरने मात्र ठरविले की, काही झाल तरी माघार घ्यायची नाही याच वेळी एक तारा आकाशातून सुटून पाण्यात पडला त्याबरोबर सागराचे पाणी एकदम पर्वताएवढे झाले आणि पुन्हा होते तसे. रत्नाकरची होडी दूरवर पाण्यात फेकली गेली. पण रत्नाकर होडीला घट्ट धरून. त्याला आता मात्र भीती वाटू लागली, हे पहाताच तो पक्षी म्हणाला,

'सकटाशी कर सामना यातच आहे सारे
इच्छित सारे मिळणार तुला ते हे नुसते वादळ वारे
खुशाल वल्हव होडी आता जोडीदार उभा तुझा नियंता'

आता त्याची होडी भोवऱ्यासारखी गरगर फिरू लागली. त्याला याचा अर्थ कळेना. त्याला आता चक्कर येणार असे वाटू लागले. हे पहाताच तो पक्षी म्हणाला,

'असा फिरतो देह जगात परिस्थितीच्या वादळीं
झुज देऊन जगणाऱ्याला देव देतसे ताकद सगळी—१
फिरून फिरून ही होडी थांबेल नकोच तू घाबरू

परमेशाची कर तू प्रार्थना नकोस भीती धरू –
आत्मा हे पिंजऱ्यातले पाखरू –'

हे त्याचे शब्द ऐकताच रत्नाकरला धीर आला त्याने त्या पक्षाला कुरवाळले पक्षी म्हणाला, 'मला वाटल पृथ्वीवरील माणसे वाईट आहेत. पण माझी आता खात्री झाली आहे की सृष्टीतील प्राणिमात्र चागल आहत.

आता होडी थांबली व पुन्हा त्याचा प्रवास सुरू झाला. आता रत्नाकरच्या होडी वल्हवून झोप येऊ लागली तो थकला होता त्याचे हात दुखू लागले होते हे पहाताच तो पक्षी म्हणाला, 'आता तू पूर्व दिशेला बघून एक नमस्कार कर व डोळे मिटून म्हण, 'हे परमेश्वरा मला धीर दे, या जगात तुझ्याशिवाय मला कुणी आधार देणारा नाही मला मार्ग दाखव.' रत्नाकरने त्याचे सागण्याप्रमाणे केले यावेळी आकाशातून एक प्रकाशझोत त्यांच्या-वर पडला व क्षणार्धात नाहीसा झाला.

रत्नाकरने आपल्या जेवणाचा डबा काढला. त्याने हात धुतले त्या पक्षाला जवळ बसविले त्याचे चोचीत थोडी भाकरी घातली पक्षाला आनद झाला तो म्हणाला, 'नसे हे अन्न, अमृत भासे मला' किती गोड लागते आहे भाकरी '

"कसली गोड बाबा ! ही गरिबाची भाकरी तुला गोड लागली हेच नवल म्हणायच "

'तसं नव्हे खर म्हणतोय मी मला तर वाटू लागल आहे की आता पृथ्वीवरच रहाव.'

'नको रे बाबा, या पृथ्वीवर तुझे हाल होतील आता माझेच पहा ना जेव्हा मी कष्ट करीन तेव्हा मला व माझ्या आईवडि-लाना भाकरी मिळेल."

"हेही दिवस जातील, कारण रात्रीनतर प्रकाश येतोच.

संकटानंतर सुख हे येतच "

"पाहू कस काय होतंय ते ?"

"परमेश्वरान ज्या अर्थी तुला त्या रत्नासाठी एवढी मोठी सधी दिली आहे त्याअर्थी तुला यश मिळणारच "

"ठीक आहे परमेश्वरानं सकटकाळी मला तुझ्यासारखा मित्रही दिला आह हे काय थोड झाल ?"

'हं' परमेश्वराची लीला अगाध आहे 'तेथे येते मुखातुनि नाव देवाचे, तेथे न लागते पाऊल सकटाचे' पक्षी म्हणाला. रत्नाकरने थोडी भाकरी खाल्ली. त्याला जरा बरे वाटले त्याला पेंग येऊ लागली. पक्षी मात्र जागा होता तो होडीवर पहारा करीत होता.

पूव दिशला शुक्राचा तारा चमकू लागला होता. त्याच्या त्या दिव्य प्रकाशाने रत्नाकरला बरे वाटले त्याने त्याला नमस्कार केला. तो होडीत बसला त्याने सहज पाण्यात हात घातला. तोच त्याच्या हाताला काहीतरी लागले. त्याने सहज ती वस्तू आपल्या हाताल घेतली आणि काय आश्चर्य ! त्याच्या हाताला एक बासरी आली होती. त्याने ती सहज तोंडाला लावली आणि आता तो ती वाजविणार तोच त्यातून आवाज आला—

"ह थाव जरा, आताच आवाज काढू नकोस "

"का बरं ?" रत्नाकरने विचारले

"बाळ या बासरीमध्ये सात राक्षस दडून बसले आहेत ते शापित राक्षस आहेत "

'अरे बाप रे !'

"अरे वेड्या, असा घाबरू नकोस. हे राक्षस तुला काही खाणार नाहीत.

'मग ! काय करणार आहेत ते ?'

'हे पहा तू एका भोकातून सूर काढताच एक राक्षस तुझ्या-समोर हात जोडून उभा राहील व म्हणेल, "बोला काय आज्ञा आहे ?' हे ऐकताच तू त्याला काम साग तू सागशील तें काम तो करील

'पण तो राक्षस मला खाऊन तर टाकणार नाही ना ''

' छे! मुळीच काळजी करू नकोस सागराला नमस्कार कर '

'पण तू कोण आहेस ?'

मी त्या राक्षसांची आई आहे. ते पूर्वी राजकुमार होते. परंतु त्यांनी देवाचा अपमान केला म्हणून देवाने त्याला राक्षसाचे रूप दिले आहे. मीही देवाच्या शापाने बासरी झाले आहे "बाळ तुझ भाग्य आहे. तू काही काळजी करू नकोस" असे म्हणत तो आवाज बंद झाला.


तो पक्षी हे सर्व लक्ष देऊन ऐकत होता. तो म्हणाला, "हे सर्व खर कशावरून ? तू प्रथम एका भोकातून आवाज काढ पाहू अगदी सा ऽ चा आवाज" रत्नाकरालाही त्याची परीक्षा करावी असे वाटले त्याने सा ऽ असा आवाज बासरीतून काढला त्याज-बरोबर एक मोठा निळ्या रंगाचा राक्षस पाण्यात उभा राहिला. व तो म्हणाला, 'महाराज आज्ञा करा काय काम करू आपल ?'

"हे पहा सागराच्या मध्यावर मला या होडीसकट घेऊन जा" रत्नाकर म्हणाला

"फक्त येवढेच ना ?" असे म्हणून त्या राक्षसाने त्याला क्षणार्धात सागराच्या मध्यावर नेऊन सोडले व तो नाहीसा झाला पक्षी म्हणाला, "हं आता दुसरा काढ." रत्नाकरने 'रे' स्वर काढ-ताच दुसरा राक्षस उभा राहिला त्याचा रग गुलाबी होता. तो उभा राहताच गुलाबाचा सुवास आला त्याने सर्वत्र एक प्रकारचा आनद निर्माण झाला

"महाराज काय आज्ञा आहे ?" हात जोडून राक्षस म्हणाला.

रत्नाकर म्हणाला, "आम्हाला समुद्राच्या तळाशी जेथे रत्नांची खाण आहे तेथे नेऊन सोड"



—— ठीक आहे असे म्हणून त्या राक्षसाने एक सुंदर वेल निर्माण केली

"यावरून कसे जायचे ?" रत्नाकरने विचारले.

"माझे काम झाले. उगम आणि शेवट या दोनच गोष्टी मला करता येतात मी जातो." असे म्हणून राक्षस नाहीसा झाला.

पक्षी म्हणाला, "आता 'श' चा आवाज काढ."

रत्नाकरने 'श' चा आवाज काढताच पिवळ्या रंगाचा राक्षस

उभा राहिला त्याच्याही येण्याने सर्वत्र चाफ्याचा सुवास सुटला

"महाराज आज्ञा करा" राक्षस म्हणाला.

"आम्हाला सागराच्या तळाशी असलेल्या रत्नाच्या खाणी-जवळ नेऊन सोड" रत्नाकर म्हणाला.

"ठीक आहे. या वेलाची आता शिडी झाली आहे त्यावर या फुलाच्या पायऱ्या उतरा यावरून" असे म्हणून राक्षस गुप्त झाला

हे सर्व झाले पण पाण्यात जायचे कसे ? हा प्रश्न पुन्हा तसाच राहिला ! रत्नाकर विचार करू लागला.

पक्षी म्हणाला, " 'म' चा आवाज काढ" रत्नाकरने बासरीतून 'म' असा आवाज काढताच चौथा राक्षस उभा राहिला त्याचा रंग लाल होता. तो उभा राहताच सर्व समुद्रभर प्रकाश पडला

"महाराज आज्ञा व्हावी" हात जोडून राक्षस म्हणाला.

'हे पहा आम्हाला सागराच्या तळाशी असलेल्या, रत्नाच्या खाणीजवळ नेऊन सोडा '

"ठीक आहे. माझे तोंडात बसा" राक्षसाने तोंडाचा जबडा उघडला त्याबरोबर एक मोठे दार उघडले गेले. होडीला त्याच्या जिभेची फळी लागली. त्यावरून रत्नाकर व तो पक्षी असे दोघे त्या राक्षसाचे जबड्यात जाऊन उभे राहिले आणि क्षणार्धात दोघे एका रत्नजडित दारापुढे जाऊन उभे राहिले. राक्षस केव्हा गुप्त झाला हे कळलेच नाही त्याच वेळी सोन्याच्या दोन सुसरी आपले विक्राळ रूप घेऊन त्या दारापाशी आल्या, त्यांना पहाताच रत्नाकरने संकट ओळखून 'प' चा आवाज काढला त्याबरोबर राक्षस उभा राहिला रत्नाकरने त्याला त्या सुसरींना मारण्यास सांगितले त्या सुसरींना त्या राक्षसाने मारले सर्वत्र सोन्याचे पाणीच झाले. ते पाणी चकाकत होते.

त्या राक्षसाचा रंग होता हिरवा रत्नाकरने ते दार उघड-

ण्याचा खूप प्रयत्न केला परंतु जमेना शेवटी त्याचा पाय चुकून दाराजवळ असलेल्या एका वेलीवरच्या फुलाला लागला आणि त्याबरोबर दार उघडले गेले दार उघडताना 'सा रे ग म प ध नी सा' असे मधुर स्वर त्याचे कानावर पडून सुस्वागतम् असे म्हणून एक पक्षी आत उडाला आत पाऊल टाकताच सर्वत्र सुगंधच सुगंध रत्नाकर पुढे चालू लागला त्याच्या पायाखाली पाचूचा गालीचा होता आजूबाजूला रत्नांनी मढवलेले अनेक खांब होते रत्नाकर जरा पुढे गेला तोच त्याच्या पुढे दोन चकाकणाऱ्या तलवारी उभ्या राहिल्या त्यांनी त्याचा मार्ग बंद केला समोरून एक गोड आवाज आला "कोण तुम्ही ? काय पाहिजे तुम्हाला ?"

"माझं नाव रत्नाकर मी तीन प्रकारचे रंग एकाच वेळी दाखविणाऱ्या रत्नाचे शोधार्थ आलो आहे" रत्नाकर म्हणाला

"अस्स ! नवलच म्हणायचं"

"नवल नाही, मला ते रत्न घेऊन लवकर जायचं आहे."

"अगबाई, खरं की काय ?"

"हे पहा, माझा वेळ फुकट घालवू नका"

"मग आल्या पावली परत जा रत्न मिळायचं नाही."

"का ? मी घेऊन जाणारच"

याच वेळी पक्षाने त्याला 'प' आवाज काढण्याची सूचना दिली. रत्नाकर तयारीत राहिला.

"हे पहा पुन्हा सांगते आल्या पावली परत जा नाहीतर मरणाला तयार व्हा."

"ते शक्य नाही. मी रत्न नेणारच"

"ठीक आहे" असा आवाज आला. तसेच टाळी वाजविल्याचा आवाज आला. तो आवाज येताच एक भला थोरला साप आपला जबडा पसरून रत्नाकरकडे येऊ लागला. रत्नाकरने 'प' आवाज

काढला. राक्षसाने त्या सापाचे डोक्यावर आपला पाय ठेवला व म्हणाला, "महाराज काय आज्ञा आहे ?"

"या सापाला ठार करायचं आत असलेल तीन रंग एकाच वेळी दाखविणारं रत्न आणायच व आत गोड आवाज करणाऱ्या मुलीसह आम्हाला समुद्राच्या पाण्यावर न्यायच" ठीक आहे असे म्हणून राक्षसाने त्या सापाला चिरडून ठार केले तो सर्वत्र काळा धूर झाला त्याने त्या मुलीस हाती घेतले. त्याने आतून रत्न आणले. आपला तळहात पसरला व त्यावर रत्नाकर, तो पक्षी, ती सुंदरी व ते रत्न ठेवले आणि थोड्याच वेळात तो आपल्या होडीत दाखल झाला. राक्षस गुप्त होताच त्या दिशेला निळा रंग पसरला व क्षणात नाहीसा झाला

"फारच शूर दिसता तुम्ही." ती मुलगी म्हणाली.

"छे ! तुम्हीच शूर आहात नाव काय आपल ?"

"मीनाक्षी माझं नाव. मी सागराची मुलगी, पण मला तुम्ही उगाच बाहेर काढलंत. मी आता मरणार आहे. मला पाण्यात फेका नाहीतर—"

हे ऐकताच रत्नाकरने तिला पाण्यात सोडले. तोच आवाज आला.

मी मीनाक्षी राजकुमारी सागर माझा पिता
जीवदान ते तुम्हीच दिधले निरोप घेते आता—
क्षणभर झाली भेट आपुली नव्हते नशिबी नाते
दुःखाश्रूंनी फेकित पुष्पे आज येथुनी मी जाते—
ओळख माझी ठेवा आता स्वप्ना सम तुम्ही
ऐश्वर्याला कमी न काही ही माझी हमी—

आणि एक हुंदका त्याचे कानावर पडला.

तो दुःखी झाला. पण करतो काय त्याला काहीच करता

आलं नसतं. त्याने पक्ष्याला विचारले, "आता पुढं काय करायचं?"

पक्षी म्हणाला, 'आता आपण तुमचे राजधानीस जाऊ. राजाला रत्न दाखवू म्हणजे झालं.'

रत्नाकर म्हणाला, 'स्वयंवराची तारीख उद्या आहे तेव्हा आपण अगोदर आमचे घरी जाऊ व उद्या दरबारात हे रत्न दाखवू.'

'ठीक आहे.' पक्षी म्हणाला,

रत्नाकरने 'ध' असा स्वर काढताच राक्षस उभा राहिला. रत्नाकरने त्याला व त्या पक्षाला त्याचे राजधानीत त्याचे घराचे दारापुढे उभे करण्यास सांगितले

दुसरा दिवस उजाडला सकाळी दहा वाजता स्वयंवरासाठी दरबार भरला. रत्ना हातात माळ घेऊन उभी होती. तिचे शेजारी रत्नपारखी होते अनेकानी रत्ने दाखविली. पण शूरसेनाला पाहिजे होते ते रत्न मिळेना शेवटी सर्व जणाची रत्न संपली. शूरसेन हताश झाला व तो कपाळाला हात लावून बसला. प्रधान म्हणाला, 'अजून कोणाजवळ रत्न आहे का ?'

हे ऐकताच रत्नाकर दरबारात राजापुढे उभा राहिला. त्याने रत्न त्या राजाचे हातात दिले. त्या रत्नाचा प्रकाश पडताच दरबार रंगानी चकाकला. रत्नपारखी तर थक्कच झाले त्यांनी शूरसेनाला ते रत्न खरे असल्याचे सांगितले. राजाला आनंद झाला पण रत्नाकराकडे पाहून त्याने विचारले "तू कोण ? "

"माझं नाव रत्नाकर, कोळ्याचा मी मुलगा आहे."

'काय कोळ्याचा मुलगा ? मग हे रत्न कसं मिळालं ?'

रत्नाकरने सर्व हकीकत राजाला सांगितली पण त्याला खरं वाटेना त्याने त्याला पुरावा विचारला. हे ऐकताच रत्नाकरने 'नी' आवाज काढताच राक्षस उभा राहिला.

रत्नाकरने त्याला घडलेली हकीकत सांगण्यास आज्ञा दिली.

राक्षसाने सर्व गोष्ट सांगितली इतकेच नव्हे तर रत्नाकर हा राधानगरीचा राजपुत्र असून त्या कोळ्याला सापडल्याचे त्याने सांगितले, राक्षस गुप्त झाला



सर्व दरबारातील लोक चकित झाले. रत्नाकरचे गळ्यात रत्नानें माळ घातली पक्षी गंधर्व झाला बासरी 'सा रे ग म प ध नी सा' असं गात नाहिशी झाली

मोठ्या थाटाने रत्नाकर रत्नाचे लग्न झाले.

सप्तस्वराची होती बासरी लपले त्यातच राक्षस सात
गोष्ट सांगतो ही नवलाची हीच मिठाई तुमचे हाती

# विचित्र स्वप्न

नाम मात्र जुळती जगती        आई बाप सारी नाती
कुणी नाही कोणाचे ते        ससारात गोते खाती–१
रंक असो रावही कोणी        एक दिनी सोडूनी जाती
माय माऊली ही माती        लेकरासी घेते ओटी–२
पापपुण्य करूनी जगी या        जरी जन्म घेतो प्राणी
नशिब ज्याचे त्याच्या संगे        बदलणार नाही कोणी–३

सदा सुताराचा मुलगा निवृत्ती हा खरोखरच अेक गुणी मुलगा होता लहानपणापासून त्याला देवाचे वेड फार. कुठही कथा असो, कीर्तन असो, अथवा रात्री देवळात भजन असो; निवृत्ती हा हजर असावयाचा सदाही पाडुरगाचा निःस्सीम भक्त होता त्याची बायको पार्वती ही सुद्धा परमेश्वराची भक्ती करीत असे. सदाला मुक्ता नावाची एक लहान मुलगी होती सदा पधरा वर्षाचा आणि मुक्ता बारा वर्षाची होती हे छोटे कुटुब विचित्र नगरीत सुखात राहात होते दिवसभर सदा सुताराच काम करीत असे त्याची बायको पार्वती धुणीभांडी करीत असे निवृत्ती व मुक्ता सकाळी शाळेला जात व दुपारी घरी येत असत मुक्ता ही सुद्धा हुशार मुलगी होती. तिच्या गोड आवाजाने तिला सर्व जणी कोकीळा म्हणत तो सुद्धा आपल्या मनमिळाऊ स्वभावाने सर्वांना आवडत असे

आणि असेच दिवस चालले असता विचित्रनगरीत दुष्काळ पडला. जनावरे पाण्यावाचून, अन्नावाचून मरू लागली. नगरीत रोगराई सुरू झाली आणि याची झळ या छोट्या कुटुबालाही लागली. श्रीमंत लोकानी आपले स्थलातर परगावी केले. परंतु

गरिबाना येथे राहणे भागच होते दुष्काळाला तोंड देऊन सदा संसार रेटत होता काही वेळा स्वतः नवरा बायको उपाशी राहून स्वतःच्या चिमण्या पाखराना जेवू घालत होती. परमेश्वराने माया निर्माण केली आहे त्यातून कुणीच सुटलेले नाही.

सायकाळची दिवे लागणीची वेळ होती. निवृत्ती व मुक्ता झोपडीत मिणमिणत्या चिमणीखाली अभ्यास करीत बसली होती. तोच त्यांचे शेजारील म्हादू दारापुढ आला व म्हणाला, 'पोरांनो घात झाला तुझा बा आणि आई रानात मरून पडली हाईत.' हे ऐकताच दोघेही उठली व झोपडीचे दार बद करून म्हादवाचे मागे जाऊ लागली नक्की काय झालं हे त्याना कळेना.

'म्हादू बाबा, बा अन् आईला कायर झाल?' निवृत्तीने विचारले

'अर! तुझा बा झाडावर चढून लाकड तोडीत व्हता तुझी आई खाली ते येचीत होती अन् त्याची कुऱ्हाड हातातून निसटली अन् आईच्या मानेवर पडली त्यारा तुझ्या आईची मान धडावेगळी झाली तुझ्या बान हे पघताच उंच झाडावरून 'पार्वती' म्हणून उडी घेतली अन् त्योबी खलास झाला"

हे म्हादबाचे शब्द ऐकताच निवृत्ती आणि मुक्ता जमिनीवर बसली त्याना रडू येऊ लागलं ती सारखी बाबा, आई करून रडू लागली म्हादबाला काय करावे हे सुचेना त्याने धीर देऊन पोराना म्हटल, 'बाळानो परमेश्वराच्या मनी जे व्हत ते झालं आपल नशीबच फुटक, त्येला कोन काय करणार? चला आता आपण काही तरी म्होरली वेवस्था कराया होवी' विचारी मुले उठली व त्याचे मागे आई,बाबा असा आक्रोश करीत धावू लागली.

ती जेव्हा रानात पोचली तेव्हा बरेच खेडूत तेथे जमले होते मुलानी स्वत.चे आई वडिलाना पाहताच त्यांचे प्रेताचे

अंगावर अंग टाकून बाबा-आई म्हणून रडण्यास सुरुवात केली. ते दृश्य पाहून भोवती जमलेल्या मंडळीनाही दु:खाचा आवेग सहन होईना। त्यांच्या डोळ्यातून घळघळा पाणी येऊ लागले. पण असच पुढं चालू ठेवण शक्य नव्हुत. त्यातील दोघा तिघानी मुलाना मोठ्या मुश्कीलीन प्रेताजवळून बाजूला काढल

रीतसर प्रेताची उत्तरक्रिया झाली सर्वजण स्मशानभूमी-कडून परत येऊ लागले परतु मुले मात्र तेथून हालेनात शेवटी लोकानी त्यांचे कसेबसे सात्वन करून त्यांना त्याचे झोपडीपर्यंत आणून सोडले.

मुलानी झोपडीचे दार उघडले म्हादबाही मागे होताच. म्हादबा म्हणाला, 'प्वारानो, आता झाल ते होवून ग्येल. म्होर काय व्हायच ते होणार आजची रात्र माझ्या झोपडीत काढा" मुलानाही त्यांच म्हणणं पटल व त्यांनी म्हादबाचे झोपडीत प्रवेश केला म्हाताऱ्या म्हादबाची बायको पारू हिने त्या पोराना पोटा-शी धरले व म्हणाली, 'लेकरानो आता आमचकडच ऱ्हा आमाला बी कुनी न्हाई.' त्या रात्री निवृत्ती अन् मुक्ता ही मुले त्या म्हादबाकडेच राहिली देवाचा घाला केव्हा पडेल याची माणसा-ला कल्पना नसते या जगात सर्व गोष्टी अदाजाने थोड्या फार प्रमाणात कळू शकतात, पण मृत्यू मात्र सागून येत नाही हेच खरे!

पहाटेचा सुमार होता शेजारी कोंबड्याच आरवणं होताच म्हादबान घरातील चिमणी पेटवली व पोर जागेवर आहेत का नाही ते पाहिलं– पण छे! निवृत्ती आणि मुक्ता यांची जमिनी-वर घातलेली पोती रिकामी होती. तो घाबरला. त्यान म्हातारी-ला उठवल. पोरे नाही हे ऐकताच तीही घाबरली.

'म्हजे ग्येली कुठ प्वार' म्हादबा म्हणाला.

'मला काय म्हाईत ?' म्हातारी म्हणाली.

'नवलच हाय की ह्ये.'

'पगा पगा, त्याच्या झोपडीत असत्याल.' म्हातारी म्हणाली. म्हादबाने चिमणी हातात घेतली व स्वत.चे झोपडीचे दाराकडे गेला दाराची आतील कडी उघडी होती तो बाहेर आला. बाहेरील वाऱ्याने चिमणी विझली तो घाबरला पण चिमणी स्वतःचे झोपडीचे दाराबाहेर ठेवून तो तसाच निवृत्तीचे झोपडीकडे चालू लागला त्याने निवृत्तीचे झोपडीत प्रवेश केला. तेथे चिमणी जळत होती पण झोपडीत कुणीच नव्हते. तो बाहेर आला आता काय करावे? त्याच्यापुढे पेच उद्‌भवला त्याने शेजाऱ्यापाजाऱ्याना उठवले व घडलेला प्रकार सागितला. लोकानाही आश्चर्य वाटले शेवटी उजाडताच शोध करायचा असे ठरले. म्हादबा स्वतःच्या झोपडीत आला त्याने बाहेरून आणलेली चिमणी जागेवर ठेवली व पोत्यावर अग टाकले पण झोप येईना. कशी येणार? त्या मुलासाठी त्याच अतःकरण तीळ तीळ तुटत होत तिकडे निवृत्ती आणि मुक्ता आता गावाचे वेशीबाहेरील शकराचे देवळात बसली होती निवृत्तीचे हातात एकतारी होती आणि मुक्ता टाळो वाजवून त्याला साथ देत होती--

काय करू सागा देवा आईबाप गेले
धरतीवरती ठेवुनी बाळे जीव मुक्त झाले–१
बाप माझा पांडुरग आई होती रुकमाबाई
आता आम्हा पुन्हा देवा मिळायची ती रे नाही–२
जन्म-मृत्यूचे हे पाश कसे तोडू सांगा देवा
कुणासाठी सागा आता पांडुरग गावा–३
नाव जरी ओठावरती शिव शकराचे येते
जुळायचे कधीही नाही तुमचे नि आमचे नाते–४

हे त्या निवृत्तीचे बोल देवळातील गाभाऱ्यात घुमत होते.

गाता गाता निवृत्तीने पिंडीला नमस्कार केला मुक्तानेही नमस्कार केला आता उजाडू लागले होते ती मुले तेथून उठणार तोच पिंडीतून आवाज आला

'मुलानो थाबा, मी जागा आहे

तुमचे हातून मोठे कार्य घडणार आहे'

मुले उभी राहून ऐकत होती पुन्हा आवाज आला 'या देवळाचे पूर्व दिशेला पन्नास मैलावर शकराचे पाढरे देऊळ आहे त्या देवळाचे मागील बाजूस एक बेलाचे झाड आहे. त्या झाडावरील दोन बेलफळे तोडा आणि मग काय होते ते पहा' आवाज बद झाला निवृत्तीला आश्चर्य वाटले. मुक्ताही आश्चर्यचकित झाली ती म्हणाली,

'भाऊ, काय रे हा आवाज कुठून आला?'

'हे परमेश्वर तर बोलला नाही ना?' निवृत्ती म्हणाला.

'तसंच असेल नाही तर अशा वेळी इथ कोन असणार?'

'ह तेही खरच, दैवान जरी आपल्याला धिकारलं असल तरी देव मदत करतो आहे अस वाटत निवृत्त' म्हणाला. मुले देवळाच्या पायऱ्या उतरून खाली आली. बाजूला ओढा वहात होता त्यात त्यानी स्नान केले. ओले कपडे खाद्यावर घेतले व ती दोन चिमणी पाखरे पूर्व दिशेला चालू लागली तिकडे म्हादबाने व इतरानी पोराचा शोध केला पण ती सापडली नाहीत गावकऱ्याना अतिशय हळहळ वाटली, पण त्याचे हातात तरी काय होते? त्यानी खूप प्रयत्न केला तरीही शोध लागला नाही कारण निवृत्ती आणि मुक्ता केव्हाच त्या विलासनगरीच्या पाशातून मुक्त झाली होती फक्त शिल्लक राहिली होती ती सदाची छोटी झोपडी— दुपारचे ऊन रणरणू लागले होते. मुलाचे पायाला चटके बसत होते आता त्याना भूकही लागली होती.

जाता जाता वाटेत त्याना काही लोक एका झाडाखाली डबे सोडून जेवण्याचे तयारीत असलेले दिसले. मुक्ता म्हणाली, 'भाऊ चल आपण त्याचेकडे खायला मागू.'

'छे! भिक्षापात्र अवलबणे जळो जिणे लाजिरवाणे आपण गावात कुठ काही काम मिळतं का ते पाहू' निवृत्ती म्हणाला. हे वाक्य त्याचे मागे उभ्या असलेल्या एका गृहस्थाने ऐकले. त्याने निवृत्तीला पुढे येऊन विचारले–

'बाळ तुझ नाव काय?'

'निवृत्ती माझ नाव हिचं नाव मुक्ता. आम्ही या जगात निराधार आहोत' निवृत्ती खालच्या मानेने म्हणाला.

'अरेरे! चला जेवता का?' त्याने विचारले

'पण आम्हाला तुमच काहीतरी काम सागा'

'तुला गाता येत का?'

'हो.'

'मग अस करू प्रथम थोडी भाकरी खा. मग आम्हाला गाण म्हणून दाखव म्हणजे कामही झाल आणि तुझं पोटही भरेल'

—'तसच करू या भाऊ' मुक्ता म्हणाली. निवृत्ती मोठ्या नाईलाजाने त्या मडळीजवळ येऊन उभा राहिला. तो गृहस्थ त्या इतराना म्हणाला, 'मडळींनो, ही दोन पोरकी पोर आहेत. त्यांना आपल्यात सामील करून घेऊ.'

'ठीक आहे' सर्वजण म्हणाले निवृत्ती व मुक्ता यांनी जवळ वाहणाऱ्या ओढ्यातील पाण्यात हातपाय धुतले व ती त्या लोकांचे शेजारी येऊन बसली. येताना निवृत्तीने पाण्याचा लोटा भरून आणला होताच.

भाकरी खाताना मुक्ताला आईची आठवण झाली. तिचा

घास हातात राहिला व ती 'आई' म्हणून रडू लागली निवृत्ती तिचे पाठीवरून हात फिरवीत म्हणाला, 'मुक्ता मी तुला सांगितल ना, बाबा आई आता परत येणार नाहीत '

'म्हणजे काय झाल बाळानो?' त्या गृहस्थांनी विचारले

निवृत्तीने एकतारी हाती घेतली व तो गाऊ लागला–

नाममात्र जुळती जगती आईबाप सारी नाती
कुणी नाही कोणाचे ते संसारात गोते खाती--
रक असो रावही कोणी एकदिनी सोडुनि जाती
माय माऊली ही मानी लेकरासी घेते ओटी--
पाप-पुण्य करूनी जगी या जरी जन्म घेतो प्राणी
नशिब ज्याचे त्याच्या संगे बदलणार नाही कोणी--

हे गीत ऐकत असताना ते लोक डोलत होते, त्यांचे डोळ्या-तून आसवे गळत होती. निवृत्तीने गाणे थांबवले.

त्या लोकाना निवृत्ती हा कोणी साधासुधा मुलगा नाही याची खात्री पटली. लोकांचे जेवण होताच त्यानी त्या मुलांना त्याचेकडे त्याचे गावी नेण्याची व्यवस्था करणार असल्याचे सांगि-तले. निवृत्ती म्हणाला, 'महाभागानो, उगाच कशाला तसदी घेता, आमच नशीब आमच्याबरोबर चार घास दिलेत आभारी आहोत त्याने व मुक्ताने त्या सर्वांना नमस्कार केला ते लोक आश्चर्यचकित झाले परंतु वेळे अभावी त्या लोकाना तेथे फार वेळ थांबणे शक्य नव्हते. त्यानी मुलांना काही पैसे देऊ केले. पण निवृत्तीने ते घेतले नाहीत. तेव्हा ते लोक निघून गेले

निवृत्ती व मुक्ता यांनी थोडा वेळ त्याच झाडाखाली विश्रांती घेतली व ती पुढे चालू लागली

आता जसजशी रात्र पडू लागली तसतशी त्यांना अंधा-राची भीती वाटू लागली. अजून बरेच अंतर गाठावयाचे

होते ती चालतच होती रात्र भयाण वाटली होती. येव-ढ्यात त्यांना एक धर्मशाळा दिसली. ती धावतच तिकडे गेली. एक साधू चूल पेटवून अन्न शिजवीत बसला होता. पांढरी सफेद दाढी म्हातारा होता तो, अंगावर भगवी वस्त्रे होती त्याच्या निवृत्तीने व मुक्ताने त्याला लवून नमस्कार केला त्याने त्या दोघांना स्वत:चे जवळ येऊन बसण्यास खुणावले दोघेही त्याचे जवळ जाऊन बसले साधूने विचारले, 'अरे बाळांनो, येवढ्या रात्री कुठ चाललात? निवृत्तीने घडलेली सर्व हकिकत त्या साधूला सांगितली. साधू म्हणाला 'व्यर्थ आहे हा संसार!'

मुले रात्री या साधूने दिलेल्या भाकरीवर राहिली जेवण होताच साधूने निवृत्तीच्या हातातील एकतारीकडे पाहिले त्याने विचारले, 'तुला गाता येत का?'

'हो'

मग म्हण तर एखाद देवाचं गाणं.'

निवृत्ती एकतारी छेडीत गाऊ लागला.

निळ्या नभामधी लाख दीप ते लावियले कोणी
अधांतरी ही पृथ्वी फिरते निर्मियली कोणी–?
रात्री मागून दिवस उगवतो दिवसा मागु नि रात्र
कुणी देखिला आहे का हो देव कुणी जगतात–२
कोणी म्हणती साकारच तो निराकार तो म्हणति कोणी
[illegible]
सर्वांमती तो जगदीश्वर भरला आहे कणाकणातुन
दृष्टी पाहिजे बघायला परी देव पाहतो मन हृदयातून–४

साधूने निवृत्तीची पाठ थोपटली मुले झोपली दिवस-भराच्या चालण्याने त्यांना केव्हाच डोळा लागला.

पहाटे त्या धर्मशाळेवरून जाणाऱ्या खेडूताचे बोलण्याने

निवृत्ती व मुक्ता जागी झाली, पण शेजारी साधू नव्हता. त्याचा प्रवास असाच चालू होता शेवटी एक दिवस त्यानी ते शंकराचे देऊळ गाठले. वेळ सकाळची होती अजून कुणी जागे झाले नव्हते. कारण ते देऊळ गावाबाहेर होते निवृत्तीने बेलाची दोन बेलफळे तोडली व त्याने ती शकराचे देवळापुढील पायरीवर ठेवली आणि काय आश्चर्य! सदा आणि पार्वती त्याचे समोर उभी राहून हात पसरून त्यांना म्हणत होती, 'अरे या ना!'

निवृत्ती व मुक्ता बाबा आई म्हणून त्याना बिलगली

झोपडीत याचवेळी पार्वती निवृत्तीला उठवीत म्हणत होती, 'अरे निवृत्ती सकाळी शाळा न्हाई का आज ? ऊठ, चल आटप निवृत्तीने डोळे उघडले व पाहिले तोच त्याला त्याची आई समोर दिसली शेजारीच सदा हसत उभा होता. दोघाचे मध्ये मुक्ता हसत उभी होती.

सदा म्हणाला, 'काय रे झोपेत काय गात व्हतास ? अ?'

निवृत्तीने आई-वडिलांचे पायावर डोके ठेवले व म्हणाला-

पंढरीच्या पाडुरगा  
आणि आई रुक्माबाई  
लेकराना सोडुनिया  
जाऊ नगा कोठे माई

● ●

# जत्रेमधला जादूगार

बाहेर मुसळधार पाऊस पडत होता विजाचा कडकडाट व ढगांचा गडगडाट चालू होता मधूनच एकादे कुत्रे क्यें क्यें करीत इकडून तिकडे धावत होते. ती झोपडी एका खेडेगावातली होती झोपडीबाहेर एक सन्यासी उभा राहून 'शभो शिवहर, काही भिक्षा दे माई' असे पुकारून उभा होता आत एक वृद्ध गृहस्थ बसला होता साधूचा आवाज ऐकून तो आतूनच म्हणाला, 'बाबा आत ये' पण साधू जागचा हलेना. तेव्हा म्हातारा खुरडत खुरडत उठला व झोपडीचे दारापाशी येत म्हणाला, 'साधू महाराज मी आधळा आहे तसाच पागळाही थोडा वेळ आत या, माझा छोटा मुलगा येताच मी तुम्हाला भिक्षा वाढायला सागतो'

'आम्ही कुणाचे घरात जात नसतो मी थाबतो मुलगा येईपर्यंत' साधू म्हणाला

'ठीक आहे पण भिक्षा मात्र घेऊन जा ह.'

'हो पण म्हातारेबाबा तुमचे डोळे कशाने गेले?'

'माझ नशीब बाबा. एक दिवस मी शेतावरून घरी परत येत असता एका माणसाने कसली तरी पूड माझ्या डोळ्यावर फेकली तसेच पायावर प्रहार केला आणि मी हा असा असहाय्य झालो.'

'याचं कारण!

'त्यानंच माझ्या मुलीला पळवून नेली असावी'

'अस्स? अरेरे!'

एवढ्यात त्या म्हाताऱ्याचा मुलगा झोपडीपुढे आला त्याने साधूला नमस्कार केला.

'नाव काय तुझं बाळ?' त्या साधूने विचारले.

'माझं नाव शंकर आहे' तो मुलगा म्हणाला.

'ठीक आहे मला भिक्षा वाढ' साधू म्हणाला

शंकरने त्याचे झोळीत जोंधळे घातले तसेच त्याच्या हातावर गुळाचा खडा व शेंगदाणे ठेवले साधूने त्याला जवळ बोलावले शंकर साधूजवळ जाताच साधू म्हणाला, 'हे पहा हे तुझे म्हातारे बाबा आहेत ना याना डोळे यावेत तें चालू लागावेत असं तुला वाटत ना?'

'हो तर. पण मी काय करू शकतो?'

'हे पहा, येथन दहा मैलावर एक हिरवा डोंगर आहे. तेथे तांबडी पाने असलेले झाड आहे त्या झाडाला निळ्या रंगाची सुपारीएवढी फळे आहेत. त्या फळातील रस जर तू बाबाचे डोळ्याला लावशील व पायावरूनही ती फळे फिरवशील तर त्यांना डोळे व पाय येतील'

'हो मी जरूर आणीन ती फळे'

'पण लक्षात ठेव दोनच फळे आण नाहीतर ते झाड तुझ्या अंगावर कोसळेल व तू त्याच्याखाली ठार होशील'

'पण कोणत्या वेळी ती फळे काढायची?'

'रात्री बारा वाजता आणि ही पुड जवळ ठेव. प्रसंगी फुंकर.'

'ठीक आहे, मी जरूर हे धाडस करीन'

'पहा बुवा मी चाललो' असे म्हणून साधू निघून गेला.

शंकरने ही घडलेली हकीकत त्या म्हाताऱ्याला सांगितली. म्हातारा शंकरचा कोणी लागत नव्हता. केवळ त्याने शंकरल

जत्रेत चुकला असता स्वतःचे घरी आणून सभाळले होता इतकेच. परंतु शकरला त्याचा लळा लागला होता म्हाताऱ्याने उगाच भलते धाडस करू नको असे शकरला बजावले, पण तो ऐकेना. रात्र होताच तो झोपडीबाहेर पडला.

पाऊस पडून गेल्याने जमिनीवर चिखल झाला होता खेडे-गाव असल्याने असख्य खड्डेही होते तरी, पण कशाची पर्वा न करता तो त्या डोंगराचे दिशेने चालला होता वाटेत त्याचे जवळून एक कुत्रे पुढे चालू लागले त्याला वाटले हे आपल्या मागे लागले आहे त्याने 'हड्' करताच ते कुत्रे माणसाचे आवाजात म्हणाले, 'बाळा मला हाकलून नकोस मी तुझा आजोबा आहे'

'म्हणजे मी नाही समजलो' शकर म्हणाला

'अरे दोन वर्षापूर्वी त्या टेकडीवरच्या जादूगाराने तुला जत्रेतून वाट चुकवून आणल आणि या खेड्यात सोडून दिले मी त्याचे मागे लागताच मला या कुत्र्याच रूप दिल आहे मी तुझा सारखा शोध करतो आहे आज सकाळी साधू आला असता मी तिथे उभा होतो. तुला पाहताच ठरवल की आज तुझ्या बरोबर जायचच'

'म्हणजे आजोबा तुम्ही ?'

'होय मीच.'

'मग असे पायी का चालता ? चला या माझ्या हातावरून मी नेतो तुम्हाला टेकडीवर.'

'छे! तुझा स्पर्श झाला तर मी तावडतोब मरण पावेन.'

'छे! मग नको, पायीच चला'

शकर व कुत्रे पुढे चालू लागले. वाटेत जाता जाता त्याच्या पायाला काहीतरी लागले. त्याने सहज जमिनीला हात लावला तोच तेथे एक नाग फणा उभारून उभा राहिला. नागाला पाह-

ताच शकर घाबरला. कुत्र्याने सापावर झेप घेताच नाग म्हणाला, 'थाब मला मारू नकोस मी तुमचा प्रधान आहे वर्षापूर्वी त्या जादुगाराने मला साप बनवले आहे.'

'कोण प्रधानजी तुम्ही ?' शकर म्हणाला

'होय मीच मीही येतो तुमच्याबरोबर सकाळीच साधूने म्ही आज टेकडीवर जाणार असल्याचे सागितले'

'अस्स ? काय गमती घडत आहेत पहा !'

शकराने त्या सापाला उचलून आपल्या खाद्यावर घेतले व तो पुढे चालू लागला

रात्र अधारी होती आकाशात चादण्या व खाली जमीन येवढच होत पण शकरने धीर सोडला नाही तो मनातून निश्चय करूनच बाहेर पडला होता की म्हाताऱ्याचे डोळे व पाय बरे करायचेच. वाटेत जाता जाता त्याला एक नदी आडवी आली. पावसाने नदीला पाणी भरपूर आले होते मग करायचे काय ? तो विचार करीत नदीचे काठावर थाबला तोच त्याला साधूच्या पुडीची आठवण झाली त्याने ती पुडी हळूच खिशातून काढली व फुकर मारली त्याबरोबर एक मोठा राक्षस त्याचेपुढे हात जोडून उभा राहिला व म्हणाला, 'महाराज मी आपला सेवक आहे. काय करू सागाव'

'आम्हाला या नदीचे पलीकडे घेऊन जा'

'ठीक आहे' असे म्हणून राक्षसाने हळूच शकरला उचलले व पलीकडच्या तीरावर नेऊन ठेवले तसेच कुत्र्यालाही व तो गुप्त झाला शकरला आनद झाला तो झपाझप पावले टाकीत टेकडीच्या दिशेने चालला होता टेकडी अजून बरीच दूर होती. वाटेत त्याला एक गाढव भेटले, ते त्याचे बरोबर चालू लागले.

शंकरला आश्चर्य वाटले त्याने सहज गाढवाचे पाठीवरून हात फिरवला लागलीच ते गाढव माणसाचे आवाजात म्हणाले, 'महाराज मला ओळखलं वाटत ?'

'कोण तुम्ही ?' शंकरने विचारले.

'मी तुमचा हुजऱ्या मानसिंग तुम्ही जत्रेतून नाहीसे झाल्याचे कळताच मी तुमचे शोधाला निघालो अन् त्या जादूगाराचे तावडीत सापडलो. दोन महिने झाले गाढवाचे जिणे जगतो आहे !'

'अरे, काय ही नशीबाची गती !'

'धनी आता तुम्ही माझे पाठीवर बसा' गाढव म्हणाले.

'बर मग पुढे ?'

'मी तुम्हाला टेकडीवर घेऊन जातो. त्या जादूगाराचे घर दाखवितो सर्व काही करतो.'

'ठीक आहे' असे म्हणून शकर गाढवावर बसला. गाढव धावू लागले थोडया वेळानतर ते गाढव बरीच वळणे घेत त्या हिरव्या डोंगराच्या पायथ्याशी येऊन उभे राहिले गाढवाने शकर-ला खाली उतरण्याची विनंती केली. गाढव म्हणाले, 'राजकुमार आता अस करा त्या ठिकाणी हिरवा दिवा दिसतो ना ? त्यावर खडा मारा दिवा विझला की ते दार उघडेल व जिना दिसेल.'

'बर मग पुढ ?

'पुढच तुम्ही बघा मी इथच तुमची वाट पहात उभा राहतो'

'पण त्या जादुगाराने काही गडबड केली तर ?'

'छे, तो आता झोपला असेल ; तुम्ही खुशाल जा आत'

शकरने हिरव्या दिव्यावर दगड मारताच तो कलडला व त्याचवेळी दार उघडण्याचा आवाज झाला तो धावतच तेथे गेला व दारातून आत शिरला.

तो जिना चढून वर गेला एका खोलीत तो जादूगार घोरत पडला होता त्याचे शेजारी एक छडी पडली होती. शकरने हळूच जाऊन ती छडी हातात घेतली. त्या छडीचा स्पर्श जमिनीला होताच तो जादूगार 'मेलो मेलो' म्हणून ओरडत उठला व जमिनी वर कोसळला शकरनें हळूच पुडीवर फुकर मारली राक्षस आला. त्याने त्याला स्वतःला त्या झाडाजवळ नेण्याची आज्ञा केली क्षणभरात राक्षसाने त्याला टेकडीवर नेऊन सोडले व तो गुप्त झाला शकरने दोन निळी फळे तोडली व याच वेळी आवाज आला, 'थाब, आणखी तीन पाने तोड, म्हणजे ते गाढव, कुत्रे व साप यांचे माणसात रूपांतर होईल फक्त प्रत्येक पान त्याचे डोळयाला लाव म्हणजे झाल ' शकरने आवाजाच्या सांगण्याप्रमाणे केले तो टेकडी उतरून खाली आला त्याने त्या गाढवाला, नागाला व कुत्र्याला माणसाचे रूप प्राप्त करून दिले आजोबा म्हणाले, 'चल आता राजधानीला जाऊ' त्यावर शकरने प्रथम त्या म्हाताऱ्याचे पाय व डोळे बरे करून नतर जावयाचे असे सागितले

त्या सर्वांनी म्हाताऱ्याचे झोपडीत प्रवेश केला म्हातारा पहाट झाल्याने जागा होऊन अथरूणावर उठून बसला होता. शकरने योग्य तसा फळाचा उपयोग केला. म्हाताऱ्याला दृष्टी व पाय आले त्याला जेव्हा कळले की शकर राजकुमार आहे तेव्हा त्याला अत्यानद झाला

परंतु त्याला आपण काम सागितले म्हणून त्याची क्षमा मागून तो रडू लागला परंतु शकरचे आजोबानी त्याला राजधानीत नेण्याचे ठरवले.

सर्वजण राजकुमारचे शकरचे राजधानीत गेले. त्याला

पहाताच राजा व राणीला आनंद झाला. त्याचे खरे नाव राजकुमार जितेंद्र, पण म्हाताऱ्याला शंकराचे वेड म्हणून त्याने त्याचे शंकर असे नाव ठेवले इतकेच–

जत्रेमध्ये चुकला वाट राजकुमार
पण देवाने दिला त्याला आधार

# जादूचा फुगा घेऊन बघा

विलासनगरीचा राजा विक्रम याला संजय नावाचा मुलगा होता. राजा दयाळू होता राजाला देवाचे वेडही होते.

एक दिवस राजकुमार संजय आपल्या राजवाड्याचे गच्चीत उभा असताना त्याला एक रंगीबेरंगी फुगा आकाशातून खाली येत असलेला दिसला. तो फुगा पारदर्शक होता त्याला अनेक रंग होते तो मध्येच मोठा होत होता आणि मध्येच लहान असे होता होता तो एका टेकडाच बाजूस खाली उतरला. संजयला आश्चर्य वाटले, म्हणून तो मोठ्या कुतूहलाने त्या दिशेकडे पाहू लागला. थोड्याच वेळात तो फुगा पुन्हा वर येऊ लागला राजकुमार मोठ्या उत्साहाने त्याच्याकडे पहात उभा राहिला त्याला त्या गोष्टीचे नवल वाटत होते तो फुगा जसजसा राजवाड्याचे दिशेने येऊ लागला तसतसा त्याचा आकार बदलत चालला. राजकुमारला याची मौज वाटली.

तो अगदी टक लावून त्या फुग्याकडे पाहू लागला. फुगा राजवाड्याचे जवळ येताच त्यामध्ये त्याला एक सुंदर तरुण मुलगी दिसली परीसारखे तिचे रूप होते राजकुमार जिना उतरून खाली आला बागेत जाऊन फुग्याच्या दिशेने गेला त्या दिशेने त्याने घोडा सोडला. घोडा भरधाव चालला होता राजकुमार असा एकटा घोड्यावर बसून गेला कुठे याचा कुणाला पत्ताच लागला नाही आकाशात फुगा जात होता घोडा खाली जमिनीवरून धावत होता

राजकुमारने जवळजवळ तीस मैल त्या फुग्याचा पाठलाग

केला परंतु त्याला त्याचा ठावठिकाणा लागला नाही शेवटी तो फुगा एका टेकडीच्या मागे हळूच नाहीसा झाला पुढे काय करावे या विचारात तो जरा वेळ थांबला. त्याला बाजूला एक पडकी धर्मशाळा दिसली तो धर्मशाळेच्या पडक्या पायऱ्या चढून वर गेला धर्मशाळेच्या एका कोपऱ्यात एक साधू चूल पेटवून स्वयपाक करीत असलेला दिसला संजयला वाटले आपण त्याचेजवळ जावे. त्याला भूकही लागली होतीच

संजय त्या साधूचे जवळ गेला. त्याने 'महाराज' अशी हाक मारून त्याना नमस्कार केला. साधूने त्याच्याकडे पाहिले दिव्या-च्या उजेडात राजकुमाराचे रूप पाहून साधू म्हणाला, 'बेटा, कोण आहेस तू ? अशा रात्री येथे का आला आहेस ?'

'महाराज माझे नाव राजकुमार संजय. मी विलासनगरीहून आलो आहे' संजय म्हणाला

'पण अशा रात्री एकटा बाहेर पडायचं कारण ?'

'महाराज, एका फुग्यातून मी एक अप्सरेसारखी मुलगी सायंकाळी पाहिली ती त्या फुग्यातून बाहेर येण्यासाठी धडपडत होती पण तिला ते जमत नव्हत.

'असं ? म्हणजे तूही ते पाहिलेस वाटते ?'

म्हणजे '

'अरे बाबा मीही ते पाहिले परंतु मी म्हातारा आहे माझ्या-च्याने येवढं लांब जाणं शक्य होणार नाही म्हणून गप्प बसलो'

'पण महाराज ही भानगड काय आहे ते तरी सांगा !'

'बेटा तू उगाच नको त्या फुग्याच्या नादी लागू'

'कारण काय ?'

'ते तुला जमणार नाही'

'पण का ?'

'कारण तो जादूगार येथून दूर शभर मैलावर एका दरीत राहतो '

'असेना लाब, मी त्याला शोधून काढणारच.'

'भगवान तुझं भल करो बेटा त्याने माझ्या मुलीलाही पळवून नेल आहे अता या गोष्टीला पधरा वर्षे झाली '

'पण तो हे सर्व कशाच्या जोरावर करतो ?

'त्याच्या हातात एक फुकणी आहे त्यातून तो तोंडाने हवा सोडतो आणि मग त्याचा फुगा होतो '

'अस आहे तर ! पण दरीतून जायला वाट तरी आहे का?'

'आहे, पण छोटी पाऊलवाट, काटयानी भरलेली मी फक्त तो एकदा दगडावर बसलेला पाहिला आहे माझी चाहूल लागताच तो दगडाच दार उघडून आत नाहीसा झाला.'

'म्हणजे डोंगर पोखरून त्याने घर केलेल दिसत '

'हू असच असाव पण महाराज, त्यान काही जादूबदू केली तर?'

'हे पहा आता काळजी करू नकोस जरा जवून घ, मग बोलू.'

साधूने त्याला लोटीतले पाणी दिले राजकुमाराने हातपाय धुतले त्या दोघांनी गरम भाकरी खाल्ली राजकुमाराने भांडी धुतली. तो साधूचे जवळ बसला. साधू म्हणाला, 'बेटा आता जरा विश्राती घे '

आता पहाट झाली होती साधूने त्याला उठवले शेजारचे विहिरीचे पाणी काढून दोघांनी सर्व विधी उरकले, आघोळी केल्या. साधूने राजकुमाराला एक चिमूटभर राख दिली व सागितले, 'या राखेची फुकर मारताच तुझं सकट नाहीस होईल ' राजकुमाराने त्यांना नमस्कार केला. राजकुमाराने डोळे उघडून पाहिले, परतु समोर साधू नव्हताच त्याला त्याचे आश्चर्य वाटले.

तिकडे राजकुमाराचा शोध राजधानीत सुरू झाला होता.

राजाराणी चिंतेत पडली होती राजाने चारी दिशाकडे राज-कुमाराचा शोध करण्यासाठी लोक पाठवले होते

तिकडे त्या मुलीची आई रडत बसली होती ती एक गरीब शेतकरी बाई होती मुलगी शेतावरून परत येत असतानाच त्या फुग्याने झडप घालून तिला पळवून नेले होते ती देवाचा धावा करीत होती लोकही हळहळत होते परंतु काय करणार बिचारी ? तिने राजाला ही गोष्ट येऊन सांगितली पण राजा तरी काय करू शकत होता? त्याने त्या बाईला तिच्या मुलीचा शोध लावतो असे आश्वासन दिले ती बिचारी घरी बसली.

तिकडे तो फुगा त्या जादुगाराच्या महालाचे खिडकीतून आत गेला होता तो जादुगार पलगावर पडून आराम घेत होता. फुगा आत आला ती मुलगी जमिनीवर उभी राहिली फुगा नाहीसा झाला

'काय सुदर आहो तू?' तो म्हणाला

'काय कुरूप आहेस तू?' ती म्हणाली

'ह अस मस्तीत बोलू नकोस '

'अरे जा करून करून काय करणार आहेस तू?'

'मी तुझ्याशी लग्न करणार आहे?

'अस्स? पण याद राख मला स्पर्श केलास तर तुझी राख होईल '

'माहीत आहे मला आता मुकाटयाने त्या खोलीत जाऊन पड '

असे म्हणून त्याने पलगावरून उठून तिला शेजारचे खोलीत लोटून दिले व बाहेरून कडी लावली. काय करणार बिचारी? अंधाऱ्या खोलीत खाली जमिनीवर पडली पण तिला स्वस्थ बसवेना. याच वेळी तिचे हाताला एक लाब खिळा लागला तिने

हळूच त्या दाराला भोक पाडून तो जादूगार काय करतो ते पाहू लागली तो जादूगार पलगावर बसून तोंडाने काहीतरी पुटपुटत, काही फुले अेका परडीत ठेवीत होता त्या फुलाचे रग क्षणाक्षणाला बदलत होते रग बदलताच तो स्वतःशीच हसत होता तसेच्च काही फुलपाखरेही त्याने निर्माण केली होती नी फुलांवरुन इकडे तिकडे फिरत होती त्याचे पख विविध रगाचे असून चकाकत होते हे सर्व पहाताना तिला मजा वाटत होती पण काळजीही वाटत होती काय करावे हे सुचत नव्हते ती जागेवरून जरा बाजूला सरकली अेका बाजूचे भितीला एक भोक होते त्यातून बाहेरचे तारे वगैरे दिसत होते तिने ते भोक खिळयाच्या सहा-य्याने जरा मोठे केले जराशी थड हवा आत आली तिला जरा बरे वाटले तिला आईची आठवण होताच रडू कोसळले. परतु तिचा नाईलाज होता त्याचे तावडीतून कसे सुटावे याचा ती विचार करू लागली पण काही सुचत नव्हते

ती पुन्हा दाराचे जवळ आली आणि त्या भोकातून पाहू लागली त्या जादूगाराचे हातात एक फुकणी होती समोर एक माजर होते जादूगाराने ती फुकणी हातात घेतली व त्यातून फुकताच त्या माजराचे वाघात रूपातर व पुन्हा माजरात रूपांतर झाले हे सर्व पाहून ती घाबरली पण तिला काही सुचत नव्हते. ती सारखा सुटकेचा विचार करीत होती आत सर्व दिवे मालवले गेले होते तो जादूगार पलगावर झोपला होता तो रात्री घोरत होता.

तिकडे राजकुमाराने आपला घोडा टाच मारून धावत ठेवला होता त्याला सायकाळचे आत ती टेकडी गाठायची होती. तो वळण घेत असता त्याने खाद्यावर एक फुलपाखरू बसले मोठे सुदर रगीत फुलपाखरू होते ते. ते सारखे त्याचे खाद्यावरून डोक्या-

वर व अंगावर बसत होते राजकुमाराचा घोडा धावतच होता ते फुलपाखरू आता राजकुमाराचे कानावर बसताच राजकुमाराने त्याचे पंख पकडले. त्याचबरोबर एका मुलीचा गोड आवाज ऐकू आला त्याने पंख सोडले ते फुलपाखरू म्हणाले 'राजकुमारा, मी कोण आहे हे तुला माहीत आहे?'

'माझे नाव रूपा–मी सातनगरची राजकन्या–'

'पण मी कोण आहे?'

'तुम्ही राजकुमार संजय आहात'

'ठीक आहे बर झाल, प्रवासात सोबत झाली' फुलपाखरू पुन्हा उडत त्याचे खांद्यावर बसले घोडा धावतच होता.

त्याला सूर्यास्तापूर्वीच ती टेकडी गाठावयाची होती त्याला तसे करू अशी उमेद वाटत होती. ते फुलपाखरूही आता खुशीत होते ते हळूच गात होते–

सुखाचा प्रवास होऊ दे रे देवा
देईन तुला मी गोड मस्त मेवा–१
सुख आणि दु ख याच्या येती लाटा
मनाचा किनारा शोधी त्यात वाटा–२
भाग्यवत कन्या जरी मी नृपाची
पडू न देशी देवा सावली नभाची–३
राजाचा कुमार आज घडे सेवा
मला रे मिळू दे भाग्यवंत ठेवा–४

घोडा धावत होता त्या शेतकऱ्याची मुलगी तेथे रडत बसली होती. जादूगाराने तिला दुसरे दिवशी पुन्हा लग्न करण्याची अट घातली पण तिने नकार दिला त्याने तिला पुन्हा दोन दिवसांची मुदत दिली होती तेथे त्या शेतकऱ्याच्या मुलीशिवाय त्या साधूचीही मुलगी होती तीही तशीच खितपत पडली होती.

त्या जादूगाराचा महाल सुंदर होता भिंतींना अनेक प्रकारचे रंग होते त्यावर नक्षीकाम काढलेले होते ठिकठिकाणी आरसे होते. बसायला कोच होते मध्ये एक पिंजरा होता त्यात एक मैना होती. ती तो जादूगार येताच त्याच्यावर रागावून म्हणत होती, 'एक दिवस तुझ्या पापाचे घडे भरणार–

तुझा मृत्यू आता लवकर येणार–
तुझी सारी जादु जळूनच जाणार–
मीच तुझी कथा जगा सांगणार–'

हे मैनेचे गाणे त्या शेतकऱ्याच्या मुलीने ऐकले होते. तिला नवल वाटत होते.

आता रात्र पडण्याच्या बेतात होती राजकुमाराला ती पांढरी टेकडी दिसत होती तसेच तिचे पायथ्याशी असलेली दरीही दिसत होती पण जायचे कसे याचा तो विचार करीत होता त्याने एका बाजूला घोडा उभा केला व एका दगडावर बसला. काय करावे याचा तो विचा करीत होता त्याला सुचत नव्हते. असा प्रसंग येईल अशी त्याची कल्पनाही नव्हती याच वेळी एक पोपट तेथे आला व संजयचे बाजूचे खडकावर बसला व म्हणाला, 'महाराज आपण असे चिंतातूर का बसला आहात ?'

हे त्या पोपटाचे बोलणे ऐकून राजकुमार म्हणाला, 'त्या जादूगाराचा शोध करून पळवून नेलेल्या त्या शेतकऱ्याचे मुलीला सोडवायचे आहे मला'

'अस्स ! पण तुम्हाला त्याची माहिती आहे का ?'

'हो पण त्याची जादू माहीत नाही'

मग ऐका तर. त्याचे हातात एक काचेची निळ्या रंगाची नळी आहे ती तो ओठात धरतो व आकाशाकडे बघून म्हणतो,

नीळे नीळे फुगा करु सांगतो त्याला आत धरु

रात्री पूर्वी माझ्या पुढे आणून त्याला हजर कर—
जय शंभो जय शंकर

आणि असे म्हणताच एक फुगा तयार होतो. मग तो त्याला नाव व ठिकाण सांगतो फुगा जातो व आपले काम करून परत येतो.

'अस्सं ! पण आपण कोण आहात ?'

'माझं नाव हिरवा. माझ्या बहिणीला जादूगाराने पळवून आणलं आहे तिला त्याने मैनेचं रूप दिलं आहे

'अस्सं ! पण यातून सुटका कशी व्हायची ?'

'आहे त्याला एक उपाय आहे. त्याचे जवळ अगदी बारीक गोळ्या आहेत अगदी साबुदाण्याएवढ्या त्या जर प्रत्येकाने तोंडात टाकल्या तर पुन्हा मूळ रूप प्राप्त होइल

'उत्तम मग तुम्ही ते का केले नाही ?'

'मी जर ते खाल्ले तर मी पुन्हा राजकुमार जितेंद्र होईन परंतु त्याचे महालातून निघणे कठीण आहे'

'काय तुम्ही राजकुमार जितेंद्र आहात ?'

'हो तुम्ही संजय ना ?'

'हो काय योगायोग आहे पहा त्या जादूगाराजवळ आणखी एक बारीक छडी आहे तांबड्या रंगाची ती छडी भिंतीवर तीन वेळा आपटताच त्यातून एक पक्षी तयार होतो व त्याच्या पाठीवर बसून तो जादूगार रात्री कुठेही फिरतो'

'कमालच आहे म्हणायची पण आता हे सारं जमायचं कसं ?

'हे पहा आता माझे चोचीला तुमचा हात लावा म्हणजे तुमचे रूप देह अगदी लहान होईल माझे पाठीवर बसा. मी तुम्हाला तेथे घेऊन जातो तेथे तो साधू आता नसेल'

'ठीक आहे' असे म्हणून राजकुमाराने त्यांच्या चोचीला स्पर्श करताच तो अगदी बाहुलीयेवढा लहान झाला व त्या पोपटाचे

पाठीवर बसला ते फुलपाखरूही त्याचे मागे बसले पोपटाने आकाशात भरारी मारली एका तासानंतर तो त्या टेकडीचे जवळ आला

त्याने हळूच राजकुमाराला त्या महालाचे खिडकीतून आत सोडले

राजकुमाराने त्या महालाचे जमिनीला पाय लावताच त्याचे रूपांतर पुन्हा राजकुमार येवढे मोठे झाले पोपट आत आला. त्याने त्याला साबुदाण्याएवढ्या गोळ्या ठेवलेली ती बाटली दाखविली महालात आपोआप दिवे लागत होते व विझत होते दिव्याचा रंग लाल होता. राजकुमार म्हणाला, 'आपण असं करू, तो जादूगार सकाळी कुठेतरी जाताच येथून आपण निघून जाऊ.'

'हो तो सूर्योदय होताच शंकराचे दर्शनाला या टेकडीचे पायथ्याशी एक मंदिर आहे येथे जातो' पोपट म्हणाला

'हो, पण निघतो कव्हा '

'भल्या पहाटेच निघतो '

'ठीक आहे आता मी सर्व टेकडीचा अंदाज घेतो '

'तुम्ही ही जपा, या फुलपाखराला जपा ' असे म्हणून राजकुमार त्या टेकडीच्या सर्व जागा पाहू लागला त्याला ती शेतकऱ्याची मुलगी भेटली त्या साधूची मुलगी पण भेटली त्याने त्या दोघींना दुसरे दिवशी सकाळी सुटका करतो असे सांगितले

रात्री बारा वाजता जादूगार परत आला. त्याने महालात येताच पलंगावर अंग टाकले मैना म्हणाली–

'आता घे शेवटची नीच माणसा तू झोप
देवाचा रे झाला आहे आता तुझ्यावर कोप'

हे ऐकून तो जादूगार हसला व म्हणाला मैने मूर्ख आहेस तू. अगोदर मी तुझ्याशी लग्न करणार आहे. मग पुढे काही झालं

तरी हरकत नाही तो झोपला व थोड्याच वेळात घोरू लागला.

आता पहाट झाली होती जादूगार आथरूणातून उठून स्नानासाठी बाहेर पडला होता. राजकुमाराने ती संधी साधली. त्या बाटलीतील गोळ्या त्या फुलपाखराला, पोपटाला व मैनेला दिल्या त्याना त्याचा मूळ देह मिळाला त्याने भिंतीवर छडी मारून पक्षाला बोलावले व त्याचे पाठीवर राजकुमारी, राजकुमार व ब्राह्मणाची मुलगी व राजकुमाराची बहीण याना बसविले. पक्षी आकाशात उडाला राजकुमाराने त्या पक्षाला कोणाला कोठे सोडायचे ते सांगितले

त्याने हळूच ती निळी नळी ओठाशी धरली व म्हणाला, 'नीळे नीळे फुगा कर त्या जादुगाराला ठार कर' असे म्हणताच एक फुगा तयार झाला व खिडकीतून बाहेर पहात होता. थोड्याच वेळात त्याला 'मेलो मेलो' अशी किंकाळी ऐकू आली आणि तांबडा धूर आकाशात जाताना दिसला.

सूर्योदय होताच सजयने पुन्हा नळी तोंडाशी धरली व म्हणाला 'नीळे नीळे फुगा कर आम्हाला घरी पोहचते कर.'

रंगीत फुगा तयार झाला त्याने त्या शेतकऱ्याचे मुलीला बोलावले ती दोघे फुग्यात शिरली फुगा आकाशात उडाला राजकुमाराने राजवाड्यात येताच सर्व घडलेली गोष्ट राजाला व राणीला सांगितली ती शेतकऱ्याची मुलगी म्हणाली,

माझे नाव साधना गरीब शेतकऱ्याची मुलगी
राजाराणी देव तुम्ही द्या लग्नाला परवानगी

राजाराणीने तिचे रूप पाहून ग्राचे मुलीबरोबर लग्न लावून दिले

BN BK-0400110